**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळ, छत्रपती संभाजीनगर**
**स्टेशन रोड, उस्मानपूरा, छत्रपती संभाजीनगर-431005**
EEmail: chair.aurboard@mahedu.gov.in Tel.No (0240) 2334228,2334284,

जा.क्र.छ.संविमं/माध्य.-अ/५८४
दिनांकः-१२/०५/२०२६

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा
छत्रपती संभाजीनगर/बीड/जालना/परभणी/हिंगोली.

विषयः- इ.१० वी व इ.१२ वी गुणपत्रक/प्रमाणपत्र शुल्काबाबत...
संदर्भः- क्र.रा.मं./लेखा -६/१९०८ दिनांक ०७/०५/२०२६ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, रा.म.च्या संदर्भीय पत्रानूसार माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च -२०२६ च्या परीक्षेपासून विद्यार्थ्यांना गुणपत्रक व प्रमाणपत्र एकत्रित छपाई करुन देणेबाबत कार्यकारी परिषदेमध्ये ठराव पारीत झालेला आहे.

तथापि इ.१० वी व इ.१२ वी फेब्रु/मार्च २०२६ परीक्षेसाठी शाळा/कनिष्ठ महाविद्याल्यांकडून प्रती विद्यार्थी स्वतंत्र गुणपत्रक रु.२०/- व प्रमाणपत्र रु.२०/- असे शुल्क आकारण्यात आलेले आहे. परंतू मंडळाकडून फेब्रु/मार्च २०२६ परीक्षेचे एकत्रित गुणपत्रक व प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे.

सबब फेब्रु/मार्च २०२६ च्या परीक्षेपासून व त्या पुढील परीक्षांकरीता विद्यार्थ्यांना देण्यात येणारे गुणपत्रक व प्रमाणपत्रावर क्युआर कोड, विद्यार्थ्याचा फोटो तसेच साईज अे-४ इ. असणार आहे. त्यामुळे जून/जुलै - २०२६ च्या परीक्षेपासून गुणपत्रक रु.२०/- व प्रमाणपत्र रु.२०/- असे स्वतंत्र शुल्क न दाखवता एकत्रितरित्या गुणपत्रक व प्रमाणपत्र शुल्क रु.४०/- आकारण्यात येणार आहे. याची नोंद घ्यावी.

प्र.विभागीय सचिव
म.रा.मा.व.उ.मा.शिक्षण मंडळ,
विभागीय मंडळ, छत्रपती संभाजीनगर

प्रत माहितीस्तवः-
मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४



C:\Users\hp\Desktop\SSC DOC\Rajya Mandal Latter 2026